

नाव : हेमराज मोतीराम मोहुर्ले
गाव : सुसूंद ता. कारंजा, जि. वर्धा
वय: ३१ वर्षे
जात: माळी (ओ. बी. सी)
व्यवसाय : शेती (८ एकर ओलित)
कुटूंब संख्या : ६ (३ मोठे, ३ मुले)

Written by **Vikas Meshram,**
Project Assistant,
FSN study under LANSA.

LANSA Leveraging Agriculture for Nutrition in South Asia | MSSRF

# घरगुती पोषण बाग

मी २०१४ पासून एम. एस. स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशन अंतर्गत पोषणा करीता कृषी प्रकल्पाशी जुळलेलो आहे. प्रकल्पाने माझ्या गावात आधी रक्ताची तपासणी केली, त्यामध्ये माझी पत्नी हिला रक्तात लोहाची कमी आहे असे तपासणी अंती दिसून आले. गावात सामूहिक पोषणबाग होती. त्याच्या प्रेरणेतून मी माझ्या घरी प्रकल्पाच्या सहकार्याने पोषणबाग तयार केली.

मी ७२ चौ. मी. क्षेत्रफळामध्ये परसबाग तयार केली. बैलाचे शेणखत परसबागेत टाकून पालक, मेथी, सांबार, चवळी, गाजर, मुळा, हळद, रताळे, साबुदाणा, मिरची, टमाटर, आंबटचुका व सभोवताली बागेच्या जांभूळ, सिताफळ, पेरू यांची लागवड केली. पहिल्या वर्षी पुरेशा प्रमाणात पाणी नव्हते तेव्हा शेजारच्या घरातील विहीरीवर मोटर लावून पाणी दिले. बागेमध्ये विविध कामे जसे पाणी टाकणे, बियाणे लावणे, तोडणी करणे या कामात माझी आई शोभा मोहुर्ले मला मदत करते.

२०१७ मध्ये मला पालक - ४ किलो, मेथी - ३.५ किलो, गाजर - २ किलो, सांबार - १.५ किलो, टमाटर - १० किलो, वांगे - १५ किलो, आंबटचुका - १ किलो एवढे भाजीपाल्याचे उत्पादन मिळाले. आठवडयाचे २००/- रूपये वाचतात. गावाच्या जवळील खरांगण्याला आहे व बाजाराला जायला व यायला रू ५०/- लागतात ते देखिल वाचतात. या बागेमुळे मला वर्षभर ताजा व सेंद्रिय भाजीपाला उत्पादन होवून मी माझ्या आहारात घेत असतो.

